प्रेस नोट.दि.०९/०१/२०२४.

## घरफोडी, जबरी चोरी व मोटार सायकल चोरीचे असे, एकुण ०७ गुन्हे शहर गुन्हे शाखेकडून उघड.

मा. पोलीस आयुक्त, सोलापुर शहर, पोलीस उप-आयुक्त गुन्हे व सहा.पोलीस आयुक्त गुन्हे, सोलापुर शहर यांनी, घरफोडी/जबरी चोरी/मोटार सायकल चोरी चे गुन्हे उघडकीस आणणे बाबत, गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करुन, सुचना दिल्या होत्या.

**अ)** दि.०५/१०/२०२३ रोजी दुपारी ०१:३०: वा. चे सुमारास आर्यन पॅराडाईज, डोणगाव रोड सलगर वस्ती येथे, एक वयस्कर महिला घरात एकटी असताना, अज्ञात आरोपीने तिचे घरात घुसून, सदर महिलेस मारहाण करून जखमी केले व तिचे गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने ओढुन घेवून गेला होता. त्या अनुषंगाने **१)** सलगरवस्ती पोलीस ठाणे येथे गुरनं-१७४/२०२३ भा.द.वि.क.३९४ अन्वये गुन्हा दाखल होता. **२)** तसेच दिनांक ३१/१२/२०२३ रोजी, विजय देशमुख नगर येथे घरफोडी झाली होती. त्यामुळे, विजापूर नाका पोलीस ठाणे गुरनं-७१३/२०२३ भादविक ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल होता. **३)** तसेच दिनांक ०१/०१/२०२४ रोजी दुपारचे वेळी सर्वसुखी नगर, सोलापूर येथे देखील घरफोडी चोरी झालेली होती. त्याबाबत सलगर वस्ती पोलीस ठाणे गुरनं-०२/२०२४ भादविक ४५४, ३८० अन्वये गुन्हा दाखल होता.

त्याअनुषंगाने, गुन्हे शाखेकडील सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथकाने वरील नमूद घरफोडी व जबरी चोरीचे ठिकाणास भेट दिली होती. त्या ठिकाणी आरोपींनी गुन्हा करताना, वापरलेली कार्यपध्दती आणि त्यानुसार, तांत्रिक विश्लेषण करून, तसेच गुप्त बातमीदारामार्फत माहिती काढून, इसम नामे-ओंकार श्रीकांत जाधव, वय-२१ वर्षे, रा.सेटलमेंट फ्रि-कॉलनी नं-४, सोलापूर यास दि.०५/०१/२०२४ रोजी ताब्यात घेवुन, त्याची अंगझडती घेतली असता, **वर नमूद ०३ गुन्ह्यातील एकूण ४७.७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने** व **गुन्हा करणेसाठी वापरलेली मोटार सायकल** असा **एकूण ३,४६,५००/- रू. किंमतीचा मुद्देमाल हा, सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथका**तील पोलीस अंमलदार अनिल जाधव, राजु मुदगल, महेश शिंदे, कुमार शेळके, मपोह/शिला काळे, ज्योती लंगोटे, सुमित्रा बारबोले, प्रकाश गायकवाड, अविनाश पाटील यांनी केली आहे.

**ब) त्याचप्रमाणे,** दिनांक ०४/०१/२०२४ रोजी सपोनि/श्रीनाथ महाडीक यांनी मिळालेल्या बातमीनुसार, इसम नामे- शिवाजी वसंत राऊत, वय- ३२ वर्षे, रा. कल्याण नगर, भाग-०३, जुळे सोलापूर, यास ताब्यात घेवून, त्याचेकडे अधिक चौकशी केली असता, त्याचेकडून, **१)** जोडभावी पेठ पोलीस ठाणे गुरनं-३८०/२०२३ भा.द.वि.क.३७९ आणि **२)** मोहोळ पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण गुरनं-१०५९/२०२१ भा.द.वि.क.३७९ असे ०२ गुन्ह्यातील एकूण ५०,०००/- रू.किंमतीचे दोन मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. **सदरची कामगिरी ही, सपोनि/श्रीनाथ महाडिक व त्यांचे तपास पथका**तील पोलीस अंमलदार पोह/भोसले, पोकॉ/शैलेश बुगड, अमिजित धायगुडे, राजकुमार वाघमारे यांनी केली आहे.

**क) त्याचप्रमाणे,** दि.०२/०१/२०२३ रोजी, सपोनि/विजय पाटील यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार आबाजी सावळे यांना, माहिती मिळाली की, सराईत गुन्हेगार नामे - आदित्य बसवराज दोडमनी ऊर्फ पोत्या हा चोरीची मोटार सायकल घेवुन, मोदी बोगदा या मार्गे, विक्री करण्याकरीता जाणार आहे. त्याप्रमाणे, सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकाने मोदी बोगदा येथे सापळा लावला. त्या ठिकाणाहुन सराईत गुन्हेगार नामे - आदित्य बसवराज दोडमनी ऊर्फ पोत्या यास शिताफीने ताब्यात घेतले. त्यावेळी, त्याचे ताब्यातील मोटार सायकल बाबत चौकशी केली असता, सदरची मोटार सायकल ही, सदर बझार पोलीस ठाणे गुरनं-०६/२०२४ भा.द.वि.क.३७९ मधील चोरीचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे, आरोपी नामे- आदित्य बसवराज दोडमनी ऊर्फ पोत्या याचेकडून, दाखल गुन्ह्यातील ६०,०००/- रू. किंमतीची चोरीची मोटार सायकल जप्त करून, सदरचा गुन्हा उघडकीस आला आहे. **सदरची कामगिरी ही, सपोनि विजय पाटील व त्यांचे तपास पथका**तील पोलीस अंमलदार पोह/राहुल तोगे, आबाजी सावळे, विठ्ठल यलमार, धीरज सातपुते यांनी केली आहे.

**ड) त्याचप्रमाणे,** दि. ०३/०१/२०२३ रोजी, सपोनि/जीवन निरगुडे यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार बापू साठे यांना, माहिती मिळाली की, इसम नामे- सिद्राम नागप्पा हावनुरकर, रा.- मंत्री चंडक नगर, भवानी पेठ, सोलापूर याने मोटार सायकल चोरी केली आहे. त्यामुळे, मिळालेल्या बातमीवरुन, नमुद इसमास ताब्यात घेवुन, त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता, त्याने, जोडभावी पेठ, पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे दाखल असलेला गुरनं.- ५५०/२०२३ भादंविसं कलम ३७९ मधील २०,०००/- रू. किंमतीची चोरीची मोटार सायकल काढुन दिल्याने, ती त्याचेकडून जप्त करणेत आली आहे. **सदरची कामगिरी सपोनि जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथका**तील पोलीस अंमलदार बापू साठे, योगेश बर्डे, वाजीद पटेल, संजय साळुंखे यांनी केली आहे.

**अशा प्रकारे गुन्हे शाखेकडील वरील नमूद तपास पथकांनी, घरफोडी चोरीचे ०२ गुन्हे, जबरी चोरीचा ०१ गुन्हा आणि मोटार सायकल चोरीचे ०४ गुन्हे असे एकूण ०७ गुन्हे उघडकीस आणुन, एकुण ०४,७६,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करणे आला आहे.**

सदरची कामगिरी ही, डॉ. श्री. राजेंद्र माने, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, सुनिल दोरगे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे, यांचे मार्गदर्शनाखाली वर नमूद तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केलेली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**

